**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक- वेतन - २०२१/२०२१-२२/०३/वेतनपथक, पुणे दिनांक - २० मे, २०२१

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य,
विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये.
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

**कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
डेक्कन महाविद्यालय व पदव्यत्तर सस्था, पुणे

**विषय - १. नव्याने नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये समावेश करणे.**

**२. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या झालेल्या बदल्यांबाबत.**

**३. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये वेतनामध्ये बदल करण्याबाबत.**

**१. नव्याने नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये समावेश करणेबाबत -**

या विभागाच्या अधिपत्याखालील ज्या अशासकीय अनुदानित महाविद्यालये आणि अकृषी व अभिमत विद्यापीठांमध्ये नव्याने कर्मचा-यांच्या नेमणुका करण्यात आलेल्या आहेत व त्यांची वेतननिश्चिती सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग पुणे यांनी करुन त्यास लेखा अधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, पुणे विभाग, पुणे यांनी मान्यता दिलेली आहे त्यांच्या टेम्प्लेट ४ ला मान्यता देण्यासाठी ज्या महाविद्यालये आणि अकृषी व अभिमत विद्यापीठांमध्ये शासन मान्य पदावर कर्मचा-यांच्या नव्याने नियुक्त्या झालेल्या आहेत फक्त अशाच महाविद्यालये/अकृषी व अभिमत विद्यापीठातील संबंधीत कर्मचा-यांची माहिती टेम्प्लेट ४ मध्ये भरुन या कार्यालयास फॉरवर्ड करावी व अशा नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचा-यांच्या नियुक्तीबाबतच्या सर्व कागदपत्रांसह आणि टेम्प्लेट ४ सह **या कार्यालयाचा इमेल आयडी payunit@jdhepune.info वर इमेलद्वारे उद्या दिनांक २१ मे, २०२१ पर्यंत पाठविण्यात यावी.**

**२. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या झालेल्या बदल्यांबाबत -**

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की माहे एप्रिल, २०२१ मध्ये ब-याच महाविद्यालयांमधील शासन मान्य पदावर कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा बदल्या झालेल्या आहेत. त्यामुळे अशा

सर्व कर्मचा-यांना त्यांच्या बदलीच्या ठिकाणी रुजू होऊन त्याप्रमाणे एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये योग्य ते बदल करण्यासाठी खालील विवरणपत्रामध्ये आपल्या महाविद्यालयाची माहिती **payunit@jdhepune.info** या इमेल आयडी वर Microsoft Excel मध्ये Times New Roman या फॉन्टमध्ये **उद्या दिनांक २१ मे, २०२१ पर्यंत** पाठवावी. **<u>तसेच बदलीबाबतची सर्व कागदपत्रे पीडीएफ मध्ये इमेल सोबत जोडण्यात यावीत. तसेच संबंधीत कर्मचा-यांना एचटीई सेवार्थ प्रणालीमधून Detach करण्यात यावे.</u>**

**माहे मे २०२१ या महिन्यामध्ये झालेल्या बदलींची माहिती दर्शविणारे विवरणपत्र**

Name of the College - H T E Sevaarth userId - H T E Sevaarth Password -

**अ) आपल्या महाविद्यालयामधून इतर महाविद्यालयांमध्ये बदली झालेल्या कर्मचा-यांच्या माहितीचे विवरणपत्र**

| S. N. | Name of the Employee | Designation | H T E Sevaarth Id | Subject (for Teachers Only) | Order No. | Order date | Date of Relieving | Post id |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**ब) इतर महाविद्यालयांमधून आपल्या महाविद्यालयामध्ये बदली झालेल्या कर्मचा-यांच्या माहितीचे विवरणपत्र**

| S. N. | Name of the Employee | Designation | H T E Sevaarth Id | Subject (for Teachers Only) | Order No. | Order date | Date of Joining | Post id |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**३. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये वेतनामध्ये बदल करण्याबाबत -**

ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या कॅस मान्य केल्यामुळे/पदोन्नती झाल्यामुळे अथवा इतर कोणत्याही बाबीमुळे वेतननिश्चिती/सुधारित वेतननिश्चिती झालेली आहे व त्यास लेखा अधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, पुणे विभाग, पुणे यांनी मान्यता दिलेली आहे यामुळे अथवा इतर कोणत्याही कारणामुळे वेतनामध्ये फरक होत असल्यास त्या अनुषंगानेची माहिती खालील विवरणपत्रामध्ये **payunit@jdhepune.info** या इमेल आयडीवर मायक्रोसॉफ्ट एक्सेलमध्ये सादर करुन याबाबतच्या वेतननिश्चितीच्या प्रतीदेखील इमेल सोबत सादर कराव्यात.

Name of the College - H T E Sevaarth userId - H T E Sevaarth Password -

| S. N. | Name of the Employee | Designation | H T E Sevaarth Id | Reason |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

तरी वरील सर्व सूचना विचारात घेऊन आपण वरील बाबींवरील आपले प्रस्ताव उद्या दिनांक २१ मे, २०२१ पर्यंत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह या कार्यालयाच्या इमेल आयडी **payunit@jdhepune.info** वर सादर करावेत

**सही/-**
(डॉ. संजय जगताप)
सहसंचालक (उच्च शिक्षण),
पुणे विभाग, पुणे

**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक- वेतन - २०२१/२०२१-२२/०३/वेतनपथक, पुणे दिनांक - २० मे, २०२१

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य,

विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये.

पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

**कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर सस्था, पुणे

**विषय - वेतन अनुदान माहे मे - २०२१.**

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील माहे मे, २०२१ चे वेतन अनुदानाची विवरणपत्र १ ते ७ मधील माहिती तयार करुन त्याप्रमाणे सदरहू माहिती एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये ऑनलाईन पद्धतीने भरण्यात यावी **आणि सदरहू देयक दिनांक २२ मे, २०२१ पर्यंत या कार्यालयाकडे फॉरवर्ड करण्यात येऊन त्याची इमेलदेखील दिनांक २२ मे, २०२१ पर्यंत पाठविण्यात यावी.**

माहे मे, २०२१ या महिन्याचे वेतन देयक नियमीत पद्धतीने ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने तयार करण्यात येऊन फॉरवर्ड/सादर करावे.

माहे मे, २०२१ चे वेतन देयक सादर करतांना अंशदायी सेवानिवृत्ती वेतन योजनेसाठी (डी.सी.पी.एस.) कर्मचा-यांची एप्रिल, २००६ या महिन्याची कपात करावयाची असून त्यासाठी **महागाई भत्त्याचे ०० टक्के दराने परिगणन करावे.**

**जे शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी माहे जुलै, २०२१ मध्ये सेवानिवृत्त होणार आहेत त्यांची भविष्य निर्वाह निधीची वर्गणीची रक्कम कपात करण्यात येऊ नये.**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे याचे दिनांक परिपत्रक क्रमांक २८४ दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० नुसार कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांचे दुसरे सत्र १५ मे, २०२१ रोजी आणि शिक्षणशास्त्र, शारीरीक शिक्षणशास्त्र व विधी विद्याशाखांचे दुसरे सत्र ३१ मे, २०२१ पर्यंत आहे. त्यामुळे अशासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांपैकी ज्यांना उन्हाळी सुट्टीचा लाभ अनुज्ञेय आहे अशा कर्मचा-यांची वाहतूक भत्त्याची रक्कम १५ दिवसांची आणि**

**शिक्षणशास्त्र, शारीरीक शिक्षणशास्त्र व विधी महाविद्यालयांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची वाहतूक भत्त्याची रक्कम पूर्ण महिन्याची परिगणित करण्यात यावी.**

**माहे एप्रिल, २०२१ या महिन्याच्या वेतनापेक्षा माहे मे, २०२१ या महिन्याचे वेतन देयकामध्ये वेतननिश्चितीमुळे ज्या कर्मचा-याच्या वेतनामध्ये फरक पडला आहे त्यांच्या वेतननिश्चितीच्या पीडीएफ मधील प्रतीदेखील मे, २०२१ या महिन्याच्या वेतन देयकासोबत इमेलद्वारे सादर करण्यात याव्यात.**

**माहे मे, २०२१ चे वेतन देयकासोबत खालील उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.**

**उपयोगिता प्रमाणपत्र**

**प्रमाणित करण्यात येते की खाली नमूद केलेली माहिती अचूक असून त्याची खात्री मी स्वतः यासाठीच्या आवश्यक असणा-या सर्व नोंदवहया तपासून करुन घेतली आहे. यामध्ये काही चुक आढळल्यास त्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहील.**

| अ. क्र. | महिना | तपशील | सहसंचालक पुणे यांचेकडून बँक ऑफ महाराष्ट्रच्या वेतन खात्यामध्ये जमा केलेली रक्कम | प्रत्यक्ष वितरीत रक्कम | शिल्लक रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| | | **एकूण** | | | | |

तरी उपरोक्त बाबी विचारात घेऊन आपण आपले महाविद्यालय/अकृषी आणि अभिमत विद्यापीठाचे माहे मे, २०२१ चे वेतन देयक एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये फॉरवर्ड करावे आणि अशा ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने तयार केलेल्या वेतन देयकाची विवरणपत्र १ ते ७ मधील माहिती इमेलद्वारे payunit@jdhepune.info या इमेल आयडीवर दिनांक २२ मे, २०२१ पर्यंत सादर करावी.

**सही/-**
(डॉ. संजय जगताप)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे